## प्रकरण पाचवे

## उपसंहार

यापूर्वीच्या प्रकरणात आपण महात्मा जोतीराव फुले यांचा जीवनपट, त्यांचे वाङ्मय, १९ व्या शतकातील सामाजिक, आर्थिक व विशेषत: शेतीची परिस्थिती आणि अधिक प्रकर्षाने चौथ्या प्रकरणात त्यांनी मांडलेल्या शेती आणि शेतकरी यांच्याबद्दलच्या विविध विचारांचा चिकित्सक आढावा घेतलेला आहे.

या प्रकरणात महात्मा जोतीराव फुले यांच्या शेती व शेती-विषयक विचारांना अर्थशास्त्रीय परिमाणेत निष्कर्षाच्या रूपाने मांडण्याचा मुख्य हेतू आहे.

हे निष्कर्ष मांडण्यापूर्वी एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. महात्मा जोतीराव फुले अभ्यासाने किंवा व्यवसायाने अर्थशास्त्रज्ञ नव्हते. एक प्रगल्भ सामाजिक जाणीवा असलेले व्यक्तिमत्व अशी फुल्यांची प्रतिमा मानावी लागेल. अर्थात अवतीभोवती दिसून येणाऱ्या सामाजिक, आर्थिक राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक प्रभावांचा शेती आणि शेतकऱ्यांवर कसा परिणाम होत होता याचे विवेचन जरी शास्त्रीय परिमाणेत नसले तरी सामान्याला कळेल अशा भाषेत व रूचेल अशा अंगाने त्यांनी केल्याचे दिसून येते. म्हणजेच या ठिकाणी फुल्यांचे मूल्यमापन अर्थशास्त्रज्ञ म्हणून न करता व्यवहाराच्या पातळीवर एका प्रातिनिधिक परंतु सुजान शेतकऱ्याला तत्कालीन परिस्थितीत ग्रामीण अर्थव्यवस्था कोणत्या हालाखीचे दिवस काढत होती हे सांगण्यात त्यांनी मिळविलेले यश आणि नेमकेपणा याचे मूल्यमापन होणार आहे. ही मर्यादा लक्षात घेता महात्मा जोतीराव फुले यांचे शेती व शेतकऱ्यांविषयक जे विचार होते त्यांचे अर्थशास्त्रीय परिमाणेतील प्रतिपादन निष्कर्षाच्या रूपाने यानंतरच्या परिच्छेदातून दिलेले आहे.

अ) <u>शेतक-यांविषयी</u>-

१) महात्मा फुले यांच्या लिखाणात मुख्यत: १८५० ते १८९० या कालखंडातील प्रामुख्याने महाराष्ट्रातील आणि विशेषत: पुणे परिसराशी निगडीत असलेल्या शेती व शेतक-यांविषयक आलेला आहे.

२) विशेष म्हणजे त्यांच्या इतर सर्व साहित्यात जरी ठिकठिकाणी शेती, शेतकरी, त्यांच्या बायका आणि मुले यांच्याबद्दल अनेकविध पध्दतीने मौलिक जीवनासंबंधी विचार व्यक्त झालेले असले तरी ख-या अर्थाने त्यांनी लिहिलेल्या ' शेतक-यांचा असूड ' या ग्रंथात त्यांचे विचार व्यक्त झालेले आहेत. हा ग्रंथ त्यांच्या अखेरच्या कालखंडातील आहे. म्हणजेच जवळजवळ ३५ ते ४० वर्षांचा शेती, शेतकरी आणि शेती अर्थव्यवस्था यांबद्दल अतिशय जवळून त्यांनी घेतलेले सर्व अनुभव पूर्ण उकललेल्या स्वरुपात आणि प्रौढत्वाच्या पूर्ण जबाबदारीने या ग्रंथात आलेले आहेत. म्हणूनच शेती व शेतक-यांसंबंधी महात्मा फुलेंचे विचार संक्षिप्त रुपाने मांडत असताना मुख्य आधार म्हणून ' शेतक-याचा असूड ' हाच ग्रंथ लक्षात घ्यावा लागतो.

३) या कालखंडात शेतक-यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती असा निष्कर्ष मांडता येतो व या हालाखीची मुख्य कारणे तीन प्रकारच्या पिळवणूकीत आहेत असा स्पष्ट निष्कर्ष महात्मा फुले यांनी मांडला आहे. या प्रकारच्या पिळवणूकी म्हणजेच अ) धर्म आणि धर्माच्या ठेकेदारांकडून शेतक-यांची केली जाणारी नाडवणूक, ब) नोकरशाहीकडून शेतक-यांची केली जाणारी पिळवणूक आणि क) सावकारशाहीकडून शेतक-यांची होणारी लुबाडणूक.

४) वरील पैकी धर्म आणि धर्माच्या ठेकेदारांकडून होणारी शेतक-यांची पिळवणूक वेगळया अर्थाने समाजातील उत्पादन घटकांने

पूर्णार्थाने अनुत्पादक असणाऱ्या अशा धर्मव्यवस्थेतील घटकांच्या पालन-पोषणाची जबाबदारी घेणे हा जो प्रकार मध्ययुगीन कालखंडात सर्व युरोपभर दिसून आला त्याची ही भारतीय आवृत्ती होती. धर्म आणि त्याला अनुसरून असणारे ग्रंथ आणि वाढत्या काळाबरोबर विकृत होत गेलेल्या रीती आणि परंपरा हेच धर्मशास्त्र्यांचे निर्वाहाचे साधन होते. हे साधन धर्माच्या केंद्रस्थानी असलेल्या परमेश्वर या संकल्पनेच्या माध्यमातून जगण्यासाठी अपरिहार्य आहे अशी धारणा सामान्यांच्या मनात रुजवणे यांत धर्मशास्त्र्यांचा पूर्णपणे आर्थिक हितसंबंध गुंतलेला असतो. त्या माध्यमातूनच ते अन्न, वस्त्र आणि निवारा मिळवतात. महात्मा फुले यांनी जन्म नामकरण, मुंज, विवाह आणि मृत्यू आणि मधूनमधून येणारे धार्मिक सण या प्रत्येक ठिकाणी होती उत्पन्नाच्या प्रवाहात आपला एक हिस्सा वसूल करण्याची व्यवस्था धर्मशास्त्र्यांनी मोठया धूर्तपणाने केलेली होती हे वास्तव उघड करण्याचे कार्य यांनी त्या काळात केले हे अत्यंत महत्वाचे आहे.

५) ब्रिटीश कालखंडात आणि विशेषत: फुलें यांच्या कालखंडात ब्रिटीशांची शासन व्यवस्था जवळजवळ पूर्ण प्रगत स्वरूपात अस्तित्वात आली होती. ब्रिटीश शासन आणि कायदा यांची भारतीय नागरिकांच्या-दृष्टीने होणारी अंमलबजावणी परत धर्माला जवळ असणाऱ्या ब्राह्मण वर्गाच्या माध्यमातूनच होत होती. यालाच महात्मा फुले यांनी भटशाही असे नाव दिलेले आहे. कुलकर्णी, महालकरी, मामलेदार, चिटणीस, दप्तरदार, अशा विविध अधिकारपदांवरून ब्राह्मणच शासन व्यवस्था राबवत होते. कारण त्यांच्या हातात विद्या होती. हे लोक ब्रिटीशांना सामान्यजनांची भाषा कळत नसल्याने दिशाभूल करणारे मध्यस्त म्हणून काम करीत होते. दोन्ही बाजूंच्या न समजण्याचा नेमका आर्थिक फायदा हा ब्राह्मण वर्ग करून घेत होता. आश्चर्याची गोष्ट अशी की महात्मा

फुले यांच्या काळात देखील शेतीची गैरपध्दतीने पिळवणूक हे लोक करीत होते. वेगळया शब्दात प्रत्येक कामासाठी ब्राह्मण मंडळी या ना त्या स्वरूपात लाचलुचपत करीत होते हे फुले यांनी स्पष्ट केले आहे. त्याचा एकच नमुना या ठिकाणी लक्षात घेण्यासारखा आहे तो म्हणजे खोटया हजेरीवर शूद्रांच्या सह्या घेऊन त्यांची मजुरी आपल्या खिशात टाकण्याचा धंदा सर्रासपणे य इंजिनीअरींग खात्यातील मट कामगार करीत असत. अलिकडच्या काळातील रोजगार हमी योजनेवर धुळे जिल्हात झालेला आणि लोकांच्या लक्षात आणून दिला गेलेला भ्रष्टाचार हा त्याच जातीचा आहे हे कोणाच्याही सहज लक्षात येईल. ब्राह्मण नोकरशाहीने शेतक-याला कोर्ट कचे-याची आपल्या सोयीसाठी वाट दाखवली हाही निष्कर्ष महत्वाचा आहे.

६) महात्माफुले यांनी शेतक-यांची सावकारांकडून होणारी पिळवणूक देखील स्पष्ट केली आहे. या ठिकाणी एक महत्वाची गोष्ट लक्षात येते की, दामदुप्पटीची न्यायूय पध्दत ब्रिटीश व्यवस्थेत नष्ट झाली व शेतक-याला वर्षानुवर्षे व्याजाच्या माध्यमातून पिळण्याचा आणि त्याची जमीन शेवटी लाटण्याचा मार्ग सावकारांच्या हातात आला. या काळात गावकामगार पाटील, ग्रामसभा, यांचे अधिकार नष्ट झाले आणि गावात एका अर्थाने आर्थिक मक्तेदारीचे प्रतिक म्हणून सावकार ही संस्था अधिक बलशाली स्वरूपात निर्माण झाली.

ब) <u>शेतीविषयक</u> :

१) महात्मा फुले यांच्या शेतीविषयक आर्थिक विचारात आणि पर्यायाने शेतक-यांविषयक विचारांत देखील सर्वात अधिक महत्व त्यांनी विधेच्या संबंधात मांडलेल्या विचाराला दिले पाहिजे. शेतक-याची आणि शेतीची दुरावस्था होण्याचे मुख्य कारण शेतक-याचे अशिक्षितपण आहे अशी आग्रही पण तितकीच समर्थनीय भूमिका महात्मा फुले यांनी मांडली.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

या संबंधातील त्यांचा विचार सत्रात्मक पध्दतीने त्यांच्या ' शेतक-याचा असूड ' मधील उपोद्घातातील सुरूवातीच्या विधानात स्पष्ट होते.

> विधेविना मती गेली, मतिविना नीती गेली, नीतिविना गती गेली,
> गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके सारे
> अनर्थ एका अविधेने केले .

२) शेतीमधील प्राथमिक श्रमविभागणीचे विवेचन महात्मा फुले यांनी केलेले दिसते. या विभागणीप्रमाणे कुणबी, माळी व धनगर हे तीन गट शेतीशी संबंधित असलेले त्यांनी सांगितले. कुणबी फक्त शेतीशी संबंधित कार्य करतो, तर माळी पारंपारिक शेती अधिक बागाईत शेती करतो, तर मेंढरे, बकरी यांचे कळप जे बाळगू लागले ते धनगर अशी महात्मा फुलेंची भूमिका होती. एका अर्थाने मूळ धंद्यात होत गेलेल्या व्यावसायिक वाढ आणि भेदामुळे झालेली ही श्रमविभागणी होती.

३) महात्मा फुले यांच्या म्हणण्याप्रमाणे तत्कालिन शेतीची परिस्थिती अत्यंत असमाधानकारक होती. ती परिस्थिती सुधारण्यासाठी काय केले पाहिजे याबद्दल त्यांनी केलेले विवेचन कोणत्याही जबाबदार अर्थतज्ञासारखेच आहे. त्यांच्या मते शेतीच्या दुरावस्थेचे एक कारण शेतीवर असलेली अतिरिक्त लोकसंख्या हे होते. पूर्वी राजेरजवाड्यांच्या दिमतीत राबणारी मंडळी ब्रिटीशांच्या काळात राजेशाहीचा ऱ्हास झाल्यामुळे बेकार झाली व त्यांचा भार शेतीवर पडला. लोकसंख्या कमी केल्याशिवाय ही परिस्थिती सुधारू शकत नाही असे महात्मा फुलेंचे मत होते व त्यासाठी त्यांनी शेतक-यांनी एकापेक्षा जास्त बायका करू नयेत व कमी वयात लग्ने केली जाऊ नयेत यासाठी आवश्यक ते कायदे केले पाहिजेत असे सुचविलेले दिसून येते.

४) शेती आर्थिकदृष्टया किफायतशीर होण्यासाठी तिला पाणी पुरवठा होणे आवश्यक ठरते. याची जाणीव महात्मा फुले यांना होती. त्यासाठी त्यांनी शक्य तितक्या ठिकाणी तळी आणि बंधारे बांधावेत व जमीनीची धूप थांबवावी हे जसे सुचविले तसेच जिथे जिथे शक्य होईल तिथे तलाव बांधावेत, तळी बांधावीत, विहिरी खोदाव्यात अशी सूचना केली आहे. भूपृष्ठांतर्गत पाण्याचा शोध घेण्यासाठी सर्व जमातींची पाहणी पाणाड्याकडून करून घेण्यात यावी असेही त्यांनी सुचवलेले आहे. एवढेच नव्हे तर नदी, नाले व तलावातील गाळ खतासाठी शेतकऱ्यांनी मोफत न्यावा असाही व्यावहारिक विचार त्यांनी मांडलेला आहे. सरकारी यंत्रणेचा वापर (लष्कर, पोलीस) बांधबांधण्यासाठी केला जावा असे सुचवत असताना सरकारच्या इरिगेशन खात्यामधील भ्रष्टाचार निपटून काढला पाहिजे आणि पाणीपट्टी संकलित करण्यामधील पिळवणूक टाळली पाहिजे हे त्यांनी स्पष्ट केले.

५) शेतीवरचा भार कमी करण्यासाठी आणि नोकरशाहीतील ब्राह्मणांचे वर्चस्व कमी करण्यासाठी महात्मा फुले यांनी सरकारी नोकरीत आणि शिक्षण क्षेत्रात शेतकऱ्यांची मुले असली पाहिजेत असा विचार मांडला. त्यातून पुन्हा आर्थिक विषमता वाढू नयेत म्हणून जातीजातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या राखीव करण्यात याव्यात असाही विचार त्यांनी स्पष्ट मांडलेला दिसतो.

६) शेतीविकासाच्यादृष्टीने पशुधन विकसीत करणे देखील आवश्यक आहे व त्यासाठी चांगल्या जातीच्या जनावरांची पैदास करणे तशाप्रकारचे चांगले बेणे आयात करणे आणि गोवंधदी कायदा करावा असेही त्यांनी सुचवलेले आहे.

७) शेतकऱ्यांच्यामध्ये नव्यानव्या गोष्टींचा प्रसार होण्यासाठी दरवर्षी शेतीप्रदर्शने भरवावीत, त्यात शेतकऱ्यांच्या विविध स्पर्धा असाव्यात व त्यांना बक्षीसे दिली जावीत हा ही विचार महात्मा फुले यांनी मांडलेला दिसतो. १८ व्या शतकांत ब्रिटीश शेतीची प्रगती करण्यामध्ये या मार्गाचा मोठा वापर करण्यात आलेला होता हे या ठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे.

८) शेतीवर बसवला जाणारा शेतसारा दर तीस वर्षांनी सुधारीत केला जातो पण त्या सुधारणेमध्ये शेतकऱ्यांकडून जास्तीत जास्त महसूल कसा गोळा करता येईल हाच विचार प्रमुख असतो हे महात्मा फुले यांनी दाखवून दिले. शेतसाऱ्यावर लोकल फंड बसवून शेतकऱ्यावरील एकूण करभार अतिरिक्त होण्याचाच परिणाम होतो असेही त्यांनी मत मांडल्याचे दिसते.

९) शेतीचा अप्रत्यक्ष फायदा होईल असा एक विचार महात्मा फुले यांच्या लिखाणातून व्यक्त होतो. खरे तर एकूण उत्पन्न वाटणीतील विषमता कमी व्हावी असा विचार सांगत असताना शंभर रुपयापेक्षा अधिक पगार किंवा पेन्शन असणाऱ्यांच्या उत्पन्नात कपात केली जावी परंतु लोहार, सुतार, शेतमजूर यासारख्यांच्या पगारात मात्र कपात केली जाऊ नये असे त्यांनी सुचविलेले आहे.

१०) शेती विकासाचा मार्ग शेतकऱ्यांच्या सर्वसाधारण शिक्षणातून जातो हे सांगत असतानाच महात्मा फुले यांनी शेती शिक्षणाचा विचार देखील मांडलेला आहे. शेतकऱ्यांच्या मुलांना शेती उपयुक्त (लोहारकी, सुतारकी) शिक्षण मिळाले पाहिजे, शक्य झाल्यास सरकारी खर्चाने युरोपमधील शेती शाळांमध्ये पाठवावे आणि आवश्यक असेल तेथे शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात शासकीय मदत देण्यात यावी असेही त्यांनी सुचविलेले आहे.

एकंदरीत पाहता इंग्लंडमध्ये ज्या प्रमाणे शेती प्रश्नाविषयक यंग यांनी केलेल्या लिखाणाचे महत्व स्पष्ट केले जाते. कारण ते सर्व प्रथम होते. तसेच भारताच्या बाबतीत महात्मा फुले यांचे शेतीविषयक विचार महत्वाचे मानावे लागतील. १९६० नंतर शिक्षणाचे अर्थशास्त्र हा एक स्वतंत्र विषय विकसित होत गेला. आज तर अशी अवस्था आहे की, आर्थिक विकासाच्या सिध्दान्तामध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे शिक्षण आणि संशोधन यांना दिले जाणारे महत्व. विकासासाठी मनुष्य बळ विकास ही प्राथमिक आवश्यक आणि कायमस्वरूपाची अट आहे असे आज जगन्मान्य झाले आहे. शिक्षणाच्या अर्थशास्त्राचा हा आधुनिक विचार महात्मा फुले यांच्या लिखाणातून अत्यंत साध्या सोप्या शब्दातून पण जबरदस्त कळकळीने देशी भाषेत १८४० पूर्वीच व्यक्त झाला हे लक्षात घेता एका अर्थाने महात्मा फुले यांना शिक्षणाच्या अर्थशास्त्राचे जनक आणि कृषी अर्थशास्त्राचे अनुभवजन्य विवेचक होते असे म्हणणे पूर्णत: समर्थनीय आहे.

MARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## संदर्भ साहित्य

१) कीर धनंजय - "महात्मा जोतीराव फुले," पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६८.

२) कीर धनंजय (सं.) - "महात्मा फुले : समग्र वाङ्मय," महाराष्ट्र मालशे स.ग. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८० (द्वितीय आवृत्ती).

३) गवळी पी.ए. - "पेशवेकालीन गुलामगिरी व अस्पृश्यता," प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९९० (तृतीय आवृत्ती).

४) चौसाळकर अशोक - "महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ," लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९०.

५) पाटील पंढरीनाथ - "महात्मा जोतीराव फुले," मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९८९.

६) पंडित नलीनी - "महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास," मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९७२.

७) फडके य.दि. (सं.) "महात्मा फुले : समग्र वाङ्मय," महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.

८) रायकर सीताराम (सं.) - "आम्ही पाहिलेले फुले," महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान प्रकाशन, पुणे, १९८९.

९) सरदार गं.बा. - "महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार," ग्रंथाली, मुंबई, १९८९.

१०) सरदार गं.बा. (सं.) - "महाराष्ट्र जीवन," खंड-१ ला, मेसर्स जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६०.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

११) साळुंखे पी.बी. (सं.) - "महात्मा फुले गौरव ग्रंथ," महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९९१.

१२) विभुते मालबा - "महात्मा फुले विचारधन," मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९९२ (द्वितीय आवृत्ती).

१३) पाटील व्ही.एम्. - "वासाहतिक समाजातील शेतकरी प्रश्न," अप्रकाशित एम.फिल्. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९८८.

14) Baden Powell - "The Land System of British India", Vol. III, Oxford University Press, 1974.

15) Chandra Bipan - "The Rise of Economic Nationalism in India", Peoples Publishing House, New Delhi, 1966.

16) Datt Romesh - "Economic History of India Victorian Age", Kegan Paul; Trench, Trubner & Co. Ltd., London, 6th Edition.

17) Dharmkumar (Ed.) - "The Cambridge Economic History of India", Vol. II, Orient Longman in Association with Cambridge University Press, 1984.

18) Guha Sumit - "The Agrarian Economy of the Bombay Deccan", Oxford University Press, Madras, 1985.

19) Kavlekar and Chousalkar - "Ideas, Movements and Politics in India", Ajab Pustakalaya, Kolhapur, 1986.

20) Keer Dhaanjaya - "M.J. Phule - Father of Our Social Revolution", Popular Prakashan, Bombay, 1964.

21) Kumar Ravindra - "Western India in 19th Century", Routledge and Kegan Paul, Lodon, 1968.

22) Shide J.R. - "Dynamics of Cultural Revolution in 19th Century Maharashtra", Ajanta Publication, New Delhi, 1985.

23) Strokes Eric - "The Peasant and the Raj", Vikas Publishing House Pvt.Ltd., Delhi and Cambridge University Press, 1978.